Prabhu Shri Ramchnadra Shikshan Prasarak Mandal Tondgaon's

Affileted with Sant Gadge Baba Amravati University, Amravati

# Maotoshri Shantabai Gote Art's, Commerce & Science College, Washim

(NAAC Accredited With 'B' Grade)

# GEOGRAPHY DEPARTMENT

।। आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः ।।

# Departmental Activities

## Session :- 2021-22

# जागतिक ओझोन दिनानिमित्त आयोजित
## प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचा अहवाल

दिनांक : 16.09.2021

मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम च्या भूगोल विभागाद्वारे महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना ओझोन दिनानिमित्त ची माहिती व्हावी या उद्देशाने भूगोल विभागाने दिनांक 16 सप्टेंबर 2021 रोजी गुगल फॉर्म च्या माध्यमातून प्रश्नमंजुषाचे आयोजन केले होते तसेच गुगल मीट ॲप द्वारे विद्यार्थ्यांना भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. डी. एन. लांजेवार यांनी मार्गदर्शन केले आपल्या मार्गदर्शनात त्यांनी ओझोन दिन का साजरा केला जातो याविषयी माहिती दिली त्यांनी आपल्या मार्गदर्शनात १६ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय ओझोन थर संरक्षण दिवस साजरा केला जातो. ओझोन थर हा स्ट्रॅटोस्फियरचा थर पृथ्वीला सूर्याच्या अतिनील किरणांच्या हानिकारक प्रभावापासून मानवाचे संरक्षण करतो. हा ऑक्सिजनच्या तीन अणूंचा समावेश असलेला वायू असून तो पृथ्वीच्या वातावरणाचा एक थर आहे, जो सूर्यापासून येणाऱ्या अतिनील किरणांपासून आपले संरक्षण करण्याचे काम करतो.

वास्तविक, ओझोनचा थर (Ozone Layer) हा ऑक्सिजनच्या तीन अणूंचा समावेश असलेला वायू आहे आणि तो पृथ्वीच्या वातावरणाचा एक थर आहे, जो सूर्यापासून येणाऱ्या अतिनील किरणांपासून आपले संरक्षण करण्याचे काम करतो. फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ फॅब्री चार्ल्स आणि हेन्री बुसन यांनी १९१३ मध्ये या थराचा शोध लावला होता

दरवर्षी १६ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय ओझोन थर (Ozon layer) संरक्षण दिवस साजरा केला जातो. या दिवशी सर्व देशांना आपला ओझोन थर जतन करण्यासाठी पर्यावरण संरक्षणाकडे लक्ष देण्यास प्रोत्साहित केले जाते. ओझोन ग्रहासाठी एक प्रकारचे ढाल म्हणून कार्य करते आणि हे पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे. १६ सप्टेंबर रोजी मॉन्ट्रियल प्रोटोकॉलवर सह्या केल्याच्या औचित्याने दरवर्षी जागतिक ओझोन दिवस साजरा केला जातो. ओझोन थराला नुकसान पोहोचवणाऱ्या पदार्थांचे उत्पादन आणि उपभोग टप्प्याटप्प्याने बंद करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पर्यावरण करारावर स्वाक्षरी केल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा होतो.याला १९८७ मध्ये सुरुवात झाली. ओझोन थराचा ऱ्हास का आणि कसा थांबवावा? याविषयी जनजागृती दिन म्हणूनही हा दिवस पाळला जातो. १९७० च्या उत्तरार्धात ओझोनच्या थराला छिद्र असल्याचा दावा शास्त्रज्ञांनी केला होता. यानंतर ८०च्या दशकात, जगभरातील अनेक सरकारांनी या समस्येवर विचार करण्यास सुरुवात केली. १९८५ मध्ये, ओझोन थराच्या संरक्षणासाठी व्हिएन्ना अधिवेशन स्वीकारण्यात आले. यानंतर १९ डिसेंबर १९९४ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने १६ डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय ओझोन दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. पहिला जागतिक ओझोन दिवस १९९५ मध्ये साजरा करण्यात आला.

ओझोन थर हा स्ट्रॅटोस्फियरचा थर पृथ्वीला सूर्याच्या अतिनील किरणांच्या हानिकारक प्रभावापासून मानवाचे संरक्षण करतो. वातावरणात ओझोनच्या उपस्थितीमुळे हानिकारक अल्ट्राव्हायोलेट किरणांपासून प्रभावीपणे संरक्षण केले जाते. ओझोनचा थर पूर्णपणे संपुष्टात आल्यास सजीवांना आणि आपल्या ग्रहाला


गंभीर हानी पोहोचेल. जर आपण अतिनील किरणांच्या थेट संपर्कात आलो तर त्वचेच्या कर्करोगासारखे घातक रोग होऊ शकतात. विविध मानवी क्रियाकलापांच्या परिणामी, वातावरणात सोडले जाणारे क्लोरिन आणि ब्रोमाइन अणू यांसारखी रसायने ओझोन थराच्या ऱ्हासास मुख्यत्वे जबाबदार असतात. सततच्या प्रयत्नांमुळे ओझोनच्या थरातील छिद्र अखेर बंद झाले.

विद्यार्थ्यांना ओझोन थराविषयी माहिती व्हावी या हेतूने या प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये 37 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असून सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या प्रथम क्रमांक प्रविणकूमार प्रेमचंद भालेराव व्दितीय कमांक शिवनंदन आत्माराम मापारी तर तृतिय कमांक अंकोश पंडीत चवरे या प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व प्रोत्साहन पर बक्षीस विद्यार्थी विभागाद्वारा देण्यात आले आहे.

# भूगोल विभागाद्वारा अतिथी व्याख्यानाचे आयोजन

दि.१६.०६.२०२२

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालयाच्या भूगोल विभागाद्वारे भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी 'स्पर्धा परिक्षा व भूगोल' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री संजू भाऊ गोटे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीराम महिला कला महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथील भूगोल विभाग प्रमुख प्रा. अभिजीत दौंड हे होते त्यांनी विद्यार्थ्यांना भूगोल विषयाच्या विविध शाखा व या अभ्यासचा स्पर्धा परिक्षेची तयारी करताना कशाप्रकारे उपयोग होतो. तसेच याव्यतिरीक्त भूगोलाच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध असणाऱ्या विविध क्षेत्रातील संधी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री संजय गोटे यांनी आपण आपला परिसर व समाज यासाठी पर्यावरण संवर्धन करून चांगले कार्य करून एक आदर्श ठेवू शकतो याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूगोल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. डी. एन. लांजेवार यांनी केले तर आभार कु. मयुरी पहेलवहादूर हिने व्यक्त केले. कार्यक्रमासाठी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. अभिजीत दौड




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. दिलीप लांजेवार

# पर्यावरण जनजागृती सप्ताह निमित्य अतिथी व्याख्यानाचे आयोजन


## विषय :- पर्यावरण आणि मानव

दिनांक :- ११ जून २०२२

मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या भूगोल विभागाव्दारे पर्यावरण जनजागृती सप्ताह निमित्य अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष भूगोल विभागप्रमुख डॉ. डि. एन. लांजेवार हे होते. तर कला व विज्ञान महाविद्यालय कामरगाव येथील भूगोल विभाग प्रमूख प्रा.डॉ विजय खराते हे प्रमूख मार्गदशक म्हणून उपरिथत होते तर प्रमुख पाहूणे म्हणून श्री संजय गोटे यांची उपरिथती लाभली. डॉ. विजय खराते यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना आपला परिसर, पर्यावरण व मानवी कार्यामूळे होत असलेली पर्यावरणाची हानी तसेच आधूनिकीकरणामूळे वातावरणात सोडल्या जात असलेल्या प्रदूषित वायूमूळे मानवी आरोग्यावर होत असलेले परिणाम या विषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. तर श्री संजय गोटे यांनी आपल्या परिसराला प्लास्टीक मूक्त करा कराव तसेच वृक्षारोपण करून आपण कशा प्रकारे पर्यावरणाची होणारी हानी कमी करु शकतो यावर भाष्य केले. कार्यकमाचे अध्यक्ष प्रा.डॉ. दिलीप लांजेवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी कशाप्रकारे पर्यावरण वाचविण्यासाठी प्रयत्न करून समाजाप्रती आपले असलेले कर्तव्य पार पाडता येईल या विषयी मार्गदर्शन केले कार्यकमाचे सुत्रसंचालन कु. स्वाती इंगोले हिने केले तर आभार कु. आचल तिवारी हिने व्यक्त केले. याप्रसंगी भूगोल विषयाचे बहूसंख्य विद्यार्थी उपरिथत होत.




विद्यार्थ्याना मार्गदर्शन करताना डॉ. व्हि. बी. खराते




विद्यार्थीना मार्गदर्शन करताना डॉ. दिलीप लांजेवार